# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)

४ था मजला, शासकीय तंत्र शिक्षण इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पुर्व), मुंबई- ४०० ०५१.

दू.क्र: २६४७१२५५/२६४७०९१६ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९७९

ई- मेल: director@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.org.in


जा. क्र. मरातंशिमं/ का -५३/2nd I.M/२०२० 915 दिनांक - 4 FEB 2020

**महत्वाचे / कालमर्यादीत परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
सर्व AICTE, Pharmacy,
Short-Term Courses राबविणा-या संस्था व स्वायत्त संस्था.

**विषय — संस्था मॉनिटरींग सॉफ्टवेअर मध्ये ऑनलाईन माहिती भरणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार द्वितीय सत्रामध्ये पात्र AICTE मान्यता प्राप्त अभियांत्रिकी (स्वायत्त संस्थासह) पदविका संस्था, फार्मसी पदविका संस्था तसेच Short Term Courses चालविणा-या संस्था (Non-AICTE) यांचे संस्था मॉनिटरींग **शैक्षणिक वर्ष २०१९-२०** च्या वेळापत्रकाप्रमाणे **दि. २९/०२/२०२० ते ०९/०३/२०२०** या कालावधीत करण्यात येणार आहे.

तरी मंडळाशी संलग्नित सर्व AICTE मान्यता प्राप्त अभियांत्रिकी व फार्मसी तसेच Short Term Courses चालविणा-या तसेच स्वायत्त संस्थाना संस्था मॉनिटरींग संदर्भातील सर्व माहिती ऑनलाईन भरण्यास **दि. १०/०२/२०२० ते १७/०२/२०२०** पर्यंत लिंक संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध करण्यात येईल. ज्या संस्थांचे फक्त एक वेळाच संस्था अवेक्षण केले जाते, अशा संस्थानी तसेच ज्या संस्थाचे NBA Accreditation झाले आहे अथवा ज्या संस्थांच्या अभ्यासक्रमाला Excellent दर्जा मिळाला आहे अशा सर्व संस्थाना देखिल माहीती भरणे अनिवार्य आहे.

**संस्थानी भरलेल्या माहितीनुसार Online प्रणालीद्वारे त्याचा उपयोग मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये करण्यात येत असल्याने संबधित संस्था प्रमुखांनी सदर माहिती अचुक व परीपुर्ण असेल याची त्यांच्यास्तरावर खात्री करुन घ्यावी.**

वरील माहीती भरताना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याबाबत, **मोबाईल नं. ८३५५८७०५४४/ ८६६८५४५३२२** किंवा ई-मेल **acmonitoring@msbte.com** वर संपर्क साधावा, या शिवाय कोणत्याही अडचणी असल्यास संबंधित विभागीय कार्यालयास कळविण्यात याव्यात.

संस्थांनी ०९/०२/२०२० अखेर पर्यंतची शैक्षणिक माहिती भरणे अपेक्षीत असुन सदरची माहिती **दि. १७/०२/२०२०** पर्यंत पुर्ण करुन submit करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर माहिती Submit करणा-या संस्थाकडून **दि. १८/०२/२०२० ते २४/०२/२०२०** या कालावधीत **रु.५०००/- AICTE संस्थांसाठी आणि रु.३०००/- Non-AICTE** संस्थांसाठी एवढे विलंब शुल्क भरुन माहिती submit करता येईल, तथापी **दि.२४/०२/२०२०** नंतर संस्थांना Online सॉफ्टवेअर मध्ये माहीती भरता येणार नाही. त्यामुळे सर्व संस्थांनी उपरोक्त कालावधीतच माहीती भरणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत:-उपसचिव, म.रा.तंत्र शिक्षण मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद यांना माहीतीसाठी.

E:\backup\Sunil Rathod\Marathi Letter.docx